Marathi X 2017-18

विषय -मराठी
इयत्ता-दहावी
गुण- ८०

सुचना-(१) प्रत्येक प्रश्नांचे उत्तर नवीन पानावर लिहा.
(२) प्रश्नांचा क्रमांक व उपप्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा.
(३) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
(४) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्रश्न१ला अ) पुढील प्रत्येक विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत.त्यातील अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण करून लिहा-

(१) दैत्यकुलोत्पन्न राजा प्रल्हाद............(१)
अ)अत्यंत ज्ञानसंपन्न होता.
ब) अत्यंत शीलसंपन्न होता.
क) अत्यंत धर्मसंपन्न होता.
ड)अत्यंत धैर्यसंपन्न होता.

(२) मला स्मरणशवती द्यायला...........(१)
अ) देव अजिबात विसरला की काय ?
ब) ब्रह्मदेव अजिबात विसरला की काय ?
क)देशमुख अजिबात विसरला की काय ?
ड) मथुरा अजिबात विसरला की काय ?

३) लेखक आपल्या मित्राबरोबर........(१)
अ) मातृभाषेत बोलू लागले.
ब) इंग्रजीत संभाषण करू लागले.
क) चित्पावनी भाषेत प्रश्नोत्तरे करू लागले.
ड) हिंदी भाषेत बोलू लागले.

४)शिवाजीराजे पाटलाला उद्देशून म्हणाले........(१)
अ) प्रजा ही देवासारखी आहे.
ब) प्रजा ही बहिणीसारखी आहे.
क) प्रजा ही आईसारखी आहे.
ड) प्रजा ही पोरासारखी आहे.

(ब) पुढीलपैकी कोणत्याही सात प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यांत लिहा-(७)
१) झाडावर चढणाऱ्या माशाचे नाव काय ?
२) गावात रोमटे केव्हा नाचत ?
३) लेखकाने निसर्गकन्या कोणाला म्हटले आहे ?
४) गोपूच्या डोळ्यात पाणी का उभे राहिले ?
५) जिजाऊच्या अंगाला कापरा का सुटला ?
६) कुशाबा पाटील कोणत्या वाहानातून बस स्टॉपकडे येत होता ?

७) लेखकाने गोव्याचे प्रस्थान कधी ठेवले ?
८) लेखकाच्या सोबत कोण होता ?
९) विश्वरुपदर्शनाची हौस कोणाला लागली होती ?
१०) ग्रामिण वेषभूषा केलेले जयप्रकाशजी कसे दिसत होते ?

प्रश्न २रा(अ) खाली अ गटात पाठांची नावे ब गटात त्यांच्या लेखकांची नावे दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा-(४)

| अ गट | ब गट |
| --- | --- |
| १) खरा वैज्ञानिक कोण ? | अ) पं. महादेवशास्त्री जोशी |
| २) महावीर चक्रधारी मेजर भास्कर रॉय | ब) रा.ग. गडकरी |
| ३) गोकूळ | क) जयंत विष्णू नारळीकर |
| ४)अमृताची वाट | ड) ग.प्र.प्रधान |

(ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा-(४)

१) प्रल्हाद इंद्राच्या कोणत्या गुणांवर खूष झाला ?
२) खाडीकाठाच्या जंगलाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?
३) गाडेकाराचा दिनक्रम कसा होता ?

प्रश्न ३रा(अ) पुढील प्रत्येक विधानाखाली चार पर्याय दिले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करुन लिहा-(२)

१) आगगाडी खाली पडल्यावर................
अ) लोक हादरले.
ब) गाडीवान हादरला.
क) जंगल हादरले.
ड) जमीन हादरली.

२) सोन्याचा गोळा असे कवीने..............
अ) चंद्रला म्हटले आहे.
ब) पृथ्वीला म्हटले आहे.
क) सूर्याला म्हटले आहे.
ड) ताऱ्याला म्हटले आहे.

(ब) खाली दिलेल्या काव्यांशांच्या योग्य जोड्या लावा-(२)

| अ गट | ब गट |
| --- | --- |
| १) पहा पाखरे चरोनी होति | अ) मन माऊली सकाळांची |
| २) मने इच्छा पुरविली | ब) जणू का पाळण्यात झुलती |
| | क) झाडांवर गोळा |
| | ड) वाहूनिया दूर |

(क) खालील कवितांच्या ओळीतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द लिहून ओळी पूर्ण करुन लिहा-

१) गई.........गई पुस्तकाची (पेनाची,कागदाची, वहीची)-१

२)..........सत्ता आली हाता (अवघी,सारी, सकल)-१

३) एक............आक्रमून,एक ध्येय घोषवा (पथ, वाट, मार्ग)-१

४)............कीर्तनाचे रंगी (खेळूं, नाचूं, हसूं)-१

प्रश्न४था अ)-खालीलपैकी कोणत्याही सात प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यांत लिहा-(७)

१) कीर्तनाच्या रंगी नाचून नामदेव कोणता दीप लावू इच्छितात ?

२) सर्व सिध्दीचे कारण असे तुकारामांनी कशास म्हटले आहे ?

३) कवीने फुलपाखरांस अचल असे का म्हटले आहे ?

४) जमीन आगगाडीला कशी विनवित आहे ?

५) तान्हे लेकरु कशात पडले ?

६) पंथ, जात, धर्म, यांचे भेदाभेद ज्यांना ठाऊक नाहीत अशी माणसे काय जाणतात ?

७) एका ध्येयाने प्रेरीत होण्यासाठी कवी काय करण्यास सांगतो ?

८) कुणाची चामडी लोळवू असे कवी म्हणतो ?

९) कवीच्या मते कशाची भूल पडू दे ?

प्रश्न ५वाअ)-कंसातील सूचनेप्रमाणे लिहा -

१) आम्ही सहलीला गेलो.(सर्वनाम ओळखून लिहा)-१

२) पूजा पुस्तक वाचते. (नाम ओळखून लिहा)-१

३) महेशने धडा वाचला.(काळ ओळखून लिहा)-१

४) मुली मैदानावर खेळ खेळतात.(क्रियापद ओळखून लिहा)-१

५) निर्सग छान दिसतो.(विशेषण ओळखून लिहा)-१

(ब)-पुढील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा-

१) मी व राज अगंणात खेळत होते.-१

२) मस्तकावरच्या हिमावर सोनेरी वर्ख चढला होता.-१

३) बरं! मी आपली रजा घेते आता.-१

४) राम आणि शाम चालत घरी गेले.-१

क)- पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांपासून विशेषणे बनवा-२

जसे, दया -दयाळू

१) माया-

२) विसर-

३) कष्ट-

४) कृपा-

ड)-पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांपासून भाववाचक नामे बनवा-२

जसे, गाव-गावकी.

१) माणूस-
२) आपला-
३) नाटक-
४) वडील-

इ) - खालील शब्दांची लिंगे बदलून लिहा-२

१) नवरा-
२) गाय-
३) आई-
४) मुलगा-

ई) खालील शब्दांची अनेकवचनी रुपे लिहा-२

१) फुल-
२) दुकान-
३) कपडा-
४) कळी-

प्रश्न६वा-अ) पुढील अ गटातील शब्दांच्या ब गटातील विरुध्दार्थी शब्दांशी योग्य जोडया लावा-२

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) ज्ञान | अ) अनियोजन |
| २) जय | ब)अज्ञान |
| ३) गोड | क)पराजय |
| ४) नियोजन | ड) कडू |

ब)पुढील अ गटातील शब्दांच्या ब गटातील समानार्थी शब्दांशी योग्य जोडया लावा-२

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) पूष्प | अ) माणूस |
| २) प्रेम | ब)लढाई |
| ३) इसम | क)फूल |
| ४)युध्द | ड)माया |

क) खालील शब्दांचे नामांच्या प्रकारामध्ये वर्गीकरण करा-४

( सामान्यनाम, विशेषनाम,भाववाचकनाम)

म्हापसा,फळ, चतुराई, वही, मंदार, मोठेपणा, भारत,पक्षी)

ड) खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखून लिहा-४

१) आम्ही गावी जाणार.
२) तो काम करतो.
३) मी खूप खेळतो.
४) ते मुबंईला गेले.

इ)खालील वाक्यांतील **अव्यये** ओळखून लिहा-४

१) अरेरे! फार वाईट झाले हे!

२) पाखरू कौलावर बसले.

३) विनूचा पतंग खाली येत होता.

४) अबब! केवढी मोठी ही बस!

प्रश्न ७वा- पुढील उतारा वाचून त्याखालील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा-४

आळशी माणूस हा सतत आरामाची अपेक्षा करत असतो.तर खरा काम करणारा माणूस आराम हराम है. असे मानतो. रात्रीची पाच-सहा तास झोप ही विश्रांतीसाठी पुरेशी असते. इतर वेळी त्याने सतत काम करत रहावे. उगाचच बसून राहिल्याने अंगात आळस वाढतो. उलट प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, काळ हा सतत पुढे जात असतो. तो कोणासाठी थांबत नाही. आपण तो आळसात व्यर्थ दवडला तर आपला कार्यभाग साधणार नाही.सतत तेच काम करत राहिल्यास कंटाळा येतो.म्हणून तर सहा दिवस काम रविवारी सुट्टी असते. त्या दिवशी आळसात लोळत पडण्यापेक्षा माणसाने छंदात रमून जावे.

प्रश्नः-

१) खरा काम करणारा माणूस काय मानतो?


२) विश्रांतीसाठी रात्रीची झोप किती तास पुरेशी असते?

३) सतत काम करत राहिल्यास काय होते?

४) सुट्टीच्या दिवशी काय होते?

प्रश्न ८वा- पुढील चित्राच्या आधारे त्याखालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा-४

माझ्या वाढदिवसाला आजोबांनी मला खेळण्यातली आगगाडी भेट म्हणून दिली. ती रुळावरुन चालत होती. जेव्हा ती सुरु होत होती तेव्हा छुक छुक छुक अशी आवाज करायची. मला आगगाडीचा वाहक कधीच दिसला नाही कारण तो इंजीनच्या आत बसतो. माझे सगळे मित्र आगगाडी पहायला आले.मी त्यांना पण खेळायला घेतो. माझी आई मला नेहमीच सांगते तुझी खेळणी तू सगळ्या मित्रांना खेळायला दे.



प्रश्नः-

१) आगगाडी कसा आवाज करते ?

२) आई मुलाला नेहमी काय सांगते ?

३) आगगाडी पाहायला कोण आले ?

४) आजोबांनी वाढदिवसाला मुलाला कोणती भेटवस्तू दिली ?

प्रश्न९वा- तुम्ही अनुज नाईक आहात. तुमचा पत्ता महालक्ष्मी रेसीडेन्सी क्रांती मैदाना जवळ फोंडा गोवा आहे. तुमचा मित्र आजारी आहे.त्याची विचारपूस करणारे पत्र लिहा-५ खालील मुद्दाचा आधार घ्या.

१) आरोग्याचे महत्त्व

२) व्यायाम करण्याचा सल्ला द्या.

३) पोष्टीक आहारघेण्याचा सल्ला द्या.

४) डॉक्टरांना दाखवण्याचा सल्ला द्या.

किंवा

तुम्ही अनुज नाईक आहात. तुमचा मोबाईल हरवला आहे. पोलिस स्टेशनला तक्रार करणारे पत्र लिहा.

खालील मुद्दांचा अधार घ्या.

१) मोबाईल हरवल्याची तारीख आणि वेळ.

२) कुठून हरवला.

३) मोबाईल कसा होता.

४) मोबाईल शोधून देण्याची विनंती.